MHAU120002352026

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.–७२/२०२६**
**मंगलाबाई वि. कोणीही नाही**

## निशाणी क्र.१ खालील आदेश

०१. अर्जदार क्र.१ ते ४ याने सदरहु अर्ज हा मुंबई नियमन १८२७ च्या विनीयम ८ नियम २ व ३ खाली दाखल केला आहे.

०२. अर्जदाराच्या अर्जात असे आले आहे की, त्याची आई मयत **अशोक रामचंद्र काकडे** यांचा मृत्यु **दि.३०.०९.२०२५** रोजी मौजे आमखेडा, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे झाला आहे. तसेच अर्जदाराच्या अर्जात पुढे असे आले आहे की, अर्जदार क्र.१ ही मयत अशोक यांची पत्नी व क्र.२ ते ४ हे मुले आहेत त्यामुळे ते मयत **अशोक रामचंद्र काकडे** यांचे पती आहे व त्यामुळे ते वारस आहे. सबब, अर्जदाराने सदरचे प्रकरण हे मयताचे वारस आहे, असे घोषित होवुन मिळणेबाबत दाखल केला आहे.

०३. अर्जदार क्र.२ राहुल अशोक काकडे यांनी त्यांच्या शपथेवर पुरावा प्रतिज्ञालेख **नि.क्र–८** वर दाखल केला. तसेच अर्जदाराने मयतांचे मृत्यु प्रमाणपत्र **नि.क्र.९** वर दाखल केले. अर्जदारांनी पुरसीस दाखल केली की, मयत रामचंद्र यांची आई शोभाबाई रामचंद्र काकडे हया ३० वर्षापुर्वी मयत झाल्या आहेत. त्यानंतर अर्जदाराने **नि.क्र.–११** खाली पुरावा बंद पुरसीस दाखल केली.

**०४.** अर्जदार यांचे विधीज्ञ श्री. आर. ए. गिरी यांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार हा मयत **अशोक रामचंद्र काकडे** यांचा वारस आहे, तसेच अर्जदाराने शासकीय योजनांचा लाभ घेणेसाठी, तसेच अनुकंपासाठी व इतर अनुषांगिक कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी, अर्जदार  यांना वारस प्रमाणपत्र देण्यात यावे अशी विनंती केली.

**०५.** विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला, अर्जाची व दाखल दस्तऐवजांची पाहणी केली. अर्ज दाखल केल्यानंतर सन १८२७ चा मुंबई विनियम ८ च्या नियम २ व ३ प्रमाणे न्यायालयाने अर्जदारांचे अर्ज मिळाल्यानंतर परिशिष्ट 'अ' मध्ये दिलेल्या नमुन्या नुसार घोषणापत्र काढले. त्यावरुन औरंगाबाद आवृत्तीच्या **दि.०८.०४.२०२६** रोजीच्या **"तरुण भारत"** पेपर मध्ये जाहीर नोटीस प्रकाशीत केली, ती **नि.क्र.–१०** नुसार अभिलेखात दाखल आहे. तसेच जाहीरनामा हा ग्रामपंचायत कार्यालय आमखेडा, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे तसेच

दिवाणी न्यायालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आला त्याचा अहवाल **नि.क्र.५** नुसार अभिलेखात दाखल आहे.

०६. अर्जदारांच्या हक्कास आक्षेप घेणाऱ्या सर्व इसमांनी घोषणापत्राच्या तारखेपासुन एका महिन्याच्या आत न्यायालयास निवेदन करुन, आपल्या हरकती नोंदवाव्या अशी उक्त घोषणा पत्राव्दारे त्यांना विनंती करण्यात आली होती. परंतु त्यावरुन पुरेशी होईल, अशी कोणाचीही हरकत घेण्यात आली नाही. अर्जदारांनी दाखल केलेला पुरावा हा, हा उलटतपास न झाल्यामुळे अबाधित राहिला. अर्जदाराने दाखल केलेले दस्तऐवज व अर्जदारांचा अबाधित पुरावा, यावरुन असे लक्षात येते की, **अशोक रामचंद्र काकडे** हे **दि.३०.०९.२०२५** रोजी मयत झाल्या आहे. अर्जदार क्र.१ ते ४ हे मयत **अशोक रामचंद्र काकडे** यांचे वारस असल्याचे दिसुन येते. एकंदरीत सर्व बाजुचा विचार करुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. मुंबई नियमन १८२७ च्या विनीयम ८ नियम २ व ३ प्रमाणे अर्जदार क्र.१ मंगलाबाई अशोक काकडे, क्र.२ राहुल अशोक काकडे, क्र.३ दिपक अशोक काकडे व क्र.४ अभय अशोक काकडे हे मयत **अशोक रामचंद्र काकडे** यांचे मान्यता दिलेले वारस असल्याबाबतचे परिशिष्ट 'ब' मधील नियमानुसार योग्य ते न्यायालयीन शुल्क आकारुन प्रमाणपत्र देण्यात यावे.

३. सदरच्या प्रमाणपत्राव्दारे मयताच्या मिळकतीवर अर्जदारास कुठल्याही प्रकारचा अधिकार प्रस्थापित होणार नाही.

४. अर्जदार यांनी विहीत न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर त्यांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

५. याव्दारे प्रकरण बंद करण्यात आले.

Digitally signed by PATIL MAHENDRA BHAGWAN
Date: 2026.06.24 15:12:10 +0530

**दिनांक – २४.०६.२०२६**

[एम. बी. पाटील]
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
सोयगांव